सन २०१८, खरीप हंगामात शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या भागात जनावरांच्या चारा छावण्यासाठी विभागीय आयुक्त यांना निधी वितरीत करण्याबाबत.(नाशिक विभाग)

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०४/२०१९/प्र.क.२६/म-११,**

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक:-०३ मे, २०१९.

**वाचा:-**

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि. ०१/०४/२०१९.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१९/२२४५/प्र.क्र.५५/ब-१, दि.०१/०४/२०१९.

३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.२५/०१/२०१९.

४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.१३/०२/२०१९.

५) महसूल व वन विभाग, शासन पत्र, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.३०/म-७, दि.०८/०३/२०१९.

६) महसूल व वन विभाग, शासन पत्र, क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.१२६/म-७, दि.२२/०३/२०१९.

७) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे ईमेलद्वरे प्राप्त पत्र क्र.मशा/कार्या/२/कॅम्प नगर-१/२०१९,दि.०३/०५/२०१९.

**प्रस्तावना :-**

सन २०१८ च्या खरीप हंगामात राज्यातील जिल्हयांमध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्याने, शासनाने राज्यातील २६ जिल्हयांमध्ये १५१ तालुक्यात, या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त २६८ महसुली मंडळामध्ये दुष्काळ तसेच, या क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील ९३१ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेली आहे. दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसदर्भात दि.२४/१/२०१९ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत, राज्यातील दुष्काळी भागात आवश्यकतेनुसार जनावरांना चारा व पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जनावरांच्या छावण्या उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ व ४ येथील शासननिर्णयान्वये चारा छावण्या उघडण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर निर्णयानुसार, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांच्या संदर्भ क्र.७ च्या पत्रान्वये, चारा टंचाई निवारणार्थ उपाययोजनांतर्गत चालू करण्यात आलेल्या चारा छावण्यांची देयके अदा करण्यांसाठी निधीची मागणी केली आहे.त्यानुसार निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अहमदनगर जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात आवश्यकतेनुसार उघडण्यात आलेल्या जनावरांच्या छावण्यांची देयके अदा करण्यांसाठीविभागीय आयुक्त, नाशिक यांनी रुपये ४६,८१,२१,०९९/- इतक्या निधीची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांना रुपये ४६,८१,२१,०९९/- (अक्षरी सेहेचाळीस कोटी एक्याऐँशी लाख एकवीस हजार नव्याण्णव फक्त) इतका निधीवितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षामध्ये मागणी क्र.सी-६,"२२४५, नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य, ०१, अवर्षण, १०१, अनुग्रह सहाय्य, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकांनुसार खर्च (९१) (०३) जनावरांच्या छावण्यांमध्ये चारा, पाणी, औषधे यांचा पुरवठा आणि छावण्यापर्यंत चाऱ्याच्या वाहतुकीचा खर्च(अनिवार्य), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ००७५)" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधी मधून रुपये ४६,८१,२१,०९९/- (अक्षरी सेहेचाळीस कोटी एक्याऐँशी लाख एकवीस हजार नव्याण्णव फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तो त्यांनी तात्काळ संबंधित जिल्हाधिकारी यांना वितरीत करावा.

**३. सदर निधी मिळाल्यापासून चारा छावणी देयकांच्या अदायगीचे काम त्वरीत पूर्ण करावे, चारा छावणीबाबत उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१९, दि.१३/०२/२०१६ व शासन पत्र क्रमांक दिनांक ०८/०३/२०१९ मध्ये नमूद निकष, विहित अटी व शर्ती व त्यामधील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.**

४. वितरीत निधी स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) अथवा बँक खात्यात न ठेवता तो छावणी प्रायोजक संस्था यांना थेट Electronic Clearing Services द्वारे वितरीत केला जाईल, या अटींच्या अधिन निधी वितरीत करण्यात येत आहे. तरी त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५. सदर निधीचे वाटप अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर विभागीय आयुक्त यांना करण्यात येत आहे. निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची विभागीय आयुक्त यांनी खातरजमा करावी. ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे. याबाबतची माहिती संबंधित विभागीय आयुक्त यांनी या विभागाकडे मासिक खर्चाचा अहवालासोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेखे/नोंदवह्या विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरित व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचा हिशोब पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित विभागीय आयुक्त यांनी एकत्रित महसूल व वन विभागास ( कार्यासन म-११) न चुकता सादर करावा. झालेल्या खर्चाची

महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे **उपयोगिता प्रमाणपत्र** या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करावी.

६. नियंत्रक अधिकाऱ्यांनी अनुदान वाटपाची एक प्रत सचिव (मदत व पुनर्वसन) यांना न चुकता सादर करावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार /उपकोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या बिलासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक चिठ्ठीमध्ये गौण/उपशिर्षाच्या " संगणक यंत्र " संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा, असे आदेश कृपया संबंधित अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकाऱ्यांनी दयावेत. तसेच कोषागारातून/उपकोषागारातून आहरित केलेल्या रकमेचा अहवाल शासनास सादर करावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५०६१२२४५०९७१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.05.06 12:30:08 +05'30'

**( राजश्री राऊत )**
**वित्तीय सल्लागार व सह सचिव**

**प्रति,**

१. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, नाशिक.
५. जिल्हाधिकारी,अहमदनगर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.
७. महालेखापाल १/२(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर ( ३ प्रती).
८. वित्त विभाग (अर्थसंकल्प-६/व्यय-९/अर्थोपाय कक्ष / वित्त आयोग कक्ष), मंत्रालय, मुंबई,
९. कार्यासन अधिकारी (म-७), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई,
१०.निवडनस्ती, (कार्यासन म-११)